अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 23 जुलै 2026 | वर्ष 11 वे | अंक 50 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# सोनम वांगचूंग यांच्या समर्थनार्थ तरूणाई रस्त्यावर

ब्रह्मपुरी/का.प्र.

नीट पेपर फुटी प्रकरणी हतबल झाल्या विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी गेल्या वीस दिवसापासून जागतिक कीर्तीचे संशोधक, विचारवंत, पर्यावरणवादी सोनम वांगुचक हे गेल्या २० दिवसापासून आमरण उपोषणाला बसले होते. मात्र दिनांक १८ तारखेला सरकारने कोणती सूचना न देता , कोणतीही चर्चा न करता साध्या गणवेशात पोलिसांना पाठवून पोलिसांनी बळजबरीने आणि धक्काबुकी करून सोनम वांगचुक यांना बळजबरीने उचलून नेले हे संविधान विरोधी आहे. सोनम वांगचुक यांनी विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी ,न्यायासाठी आणि भविष्यासाठी जे आंदोलन उभे केले त्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी ब्रह्मपुरी येथे सर्वपक्षीय तसेच पालक, विद्यार्थी यांच्या वतीने आक्रोश मार्च त्याचबरोबर धरणे आंदोलन व निदर्शने करण्यात आली.

सर्वप्रथम ब्रह्मपुरी येथील हुतात्मा स्मारक येथून हजारोच्या संख्येने विद्यार्थ्यांनी सरकार विरोधात तीव्र घोषना देत आक्रोशमार्च सम्राट अशोक चौक, बाजार चौक, मर्दानअली चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक आगेकूच करीत मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला मोर्चाचे



रुपांतर जाहीर सभेत होऊन विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने महामहीम राष्ट्रपती यांना तहसीलदार मार्फत मागण्याचे निवेदन देण्यात आले.

त्यानंतर ब्रम्हपुरीतील पालकांच्या वतीने तसेच सर्वपक्षीय व विविध संघटनेच्या वतीने धरणे आंदोलन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे करण्यात आले. यामध्ये सरकारच्या शैक्षणिक धोरणावर टीका करून धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्यावा या मागणीसह मोर्च्याचे संयोजक प्रशांत डांगे, विनोद झोडगे यांच्या नेतृत्वात धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात विनोद झोडगे निमंत्रक, प्रशांत डांगे निमंत्रक, डॉ.राजेश कांबळे, योगेश मिसार नगराध्यक्ष, भूषण रामटेके, गौरव भेंडारकर, राकेश पडोळे, भाऊराव राऊत, जीवन बांगडे, प्रमोद चिमूरकर, अविनाश राऊत, मोंटू पिलारे, अनुकूल शेंडे, खेमराज तिडके, प्रेमलाल मेश्राम, नंदा फुले, संजय वाळके, यांनी धरणे आंदोलनात आपल्या भावना व्यक्त करत सरकारवर रोष व्यक्त केला. त्यानंतर महामहीम राष्ट्रपती यांना उपविभागीय अधिकारी ब्रह्मपुरी यांच्या वतीने मागण्याचे निवेदन देण्यात आले. या आंदोलनाकरिता. सुरज मेश्राम, आदित्य बोरकर, सुमित वालदे, राहुल सोनटक्के, पद्माकर रामटेके, स्वप्निल राऊत, सुरज तलमले, रवी चहांदे, मामाजी वझाडे, सचिन राऊत, राहुल भोयर, ॲड आशिष गोंडाने, सुकेसनी बनसोड, प्रभू लोखंडे, लिलाधर वंजारी आदींनी सहकार्य केले.

**झाडे लावा,
झाडे जगवा...**

# ग्रामपंचायत निवडणूकांचा बिगुल लवकरच वाजणार..!

## ०४ ऑगस्टला अंतिम मतदार यादी, थेट सरपंच पदासाठी गावात राजकीय हालचालींना वेग

ब्रह्मपुरी /का.प्र.

राज्यातील प्रलंबित ग्रा.पं. निवडणुकांचा मार्ग अखेर मोकळा झाला असून, राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक प्रक्रियेच्या तयारीला जोरदार वेग दिला आहे. २०२४, २०२५ आणि २०२६ मध्ये मुदत संपलेल्या तसेच नव्याने स्थापन झालेल्या ग्राम पंचायतींसाठी लवकरच अधिकृत निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले असून गावागावांत छुप्या बैठका आणि राजकीय समीकरणांना उधाण आले आहे.

राज्यातील सुमारे १५ हजार १५५ ग्रामपंचायतींसाठी संगणक प्रणालीद्वारे प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करण्याचे काम सध्या अंतिम टप्प्यात आहे. १५ एप्रिल २०२६ रोजीच्या विधानसभा मतदार यादीच्या आधारे या निवडणुका घेतल्या जाणार आहेत. २४ जुलै प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध



केली जाईल. २४ ते २९ जुलै मतदार यादीवर हरकती व सूचना स्वीकारल्या जातील. ४ ऑगस्ट २०२६ ला अंतिम मतदार यादी जाहीर केली जाईल. अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यानंतर साधारण ८ ते १५ दिवसांच्या कालावधीत राज्य निवडणूक आयोगाकडून प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम घोषित केला जाण्याची दाट शक्यता आहे.

यावेळी ग्रामपंचायतींमध्ये सरपंचांची निवड थेट जनतेतून होणार असल्याने निवडणुकीतील चुरस अधिकच वाढली आहे. ब्रह्मपुरी तालुक्यात प्रथमच अशा प्रकारची थेट निवडणूक होत असल्याने तरुणांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळत आहे. अनेक गावांमध्ये तरुण चेहरे पुढे येत असून पारंपरिक राजकारणाला नवे आव्हान निर्माण झाले आहे. अनेक मोठ्या गावांमध्ये सरपंचपद महिलांसाठी आरक्षित झाल्याने महिला उमेदवार केंद्रस्थानी राहतील. या महिला उमेदवारांच्या पाठीशी युवक व स्थानिक नेत्यांची ताकद महत्त्वाची ठरणार आहे.

ग्रामपंचायत निवडणुका पक्षीय चिन्हावर लढवल्या जात नसल्या, तरी स्थानिक पक्षसंघटना आणि भविष्यातील राजकीय समीकरणांवर याचे थेट परिणाम दिसून येतात. एकाच राजकीय विचारसरणीचे दोन गट किंवा स्थानिक आघाड्या एकमेकांविरोधात मैदानात उतरण्याची चिन्हे आहेत. इच्छुक उमेदवारांनी कार्यकर्त्यांची जमवाजमव सुरू केली असून व्हॉट्सॲप, फेसबुकवर प्रचार आणि स्थानिक गटांच्या हालचाली वाढल्या आहेत. लोकसभा किंवा विधानसभेपेक्षाही ग्रामीण भागात ग्रामपंचायत निवडणुकीबाबत अधिक उत्सुकता असते. भावकी, आप्तसंबंध, स्थानिक नेतृत्व आणि विकास हे मुद्दे यंदाच्या निवडणुकीत महत्त्वाचे ठरणार आहेत. ४ ऑगस्टला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होताच ब्रह्मपुरी तालुक्यासह संपूर्ण ग्रामीण भागात राजकीय धुरळा उडणार, हे आता स्पष्ट झाले आहे.



## संपादकीय...

# शिस्त, संयम आणि सातत्याचा विजय

फुटबॉल विश्वचषक जिंकणे हा कोणत्याही देशासाठी केवळ क्रीडा क्षेत्रातील पराक्रम नसतो; तो त्या देशाच्या नियोजनाचा, संस्कृतीचा, प्रशिक्षण व्यवस्थेचा आणि राष्ट्रीय मानसिकतेचा विजय असतो. २०२६ च्या विश्वचषकात स्पेनने पुन्हा एकदा विजेतेपदावर कब्जा करून हेच सिद्ध केले आहे. अंतिम सामन्यात अर्जेंटिनावर मिळवलेला विजय हा केवळ एका सामन्याचा निकाल नव्हता, तर अनेक वर्षांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचा, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा आणि शिस्तबद्ध फुटबॉल सरावाचा परिपाक होता. स्पेनच्या या विजेतेपदाने जगाला पुन्हा एकदा आठवण करून दिली की, महान संघ एका दिवसात घडत नाही. त्यासाठी दशकानुदशके मेहनत, पायाभूत सुविधा, प्रशिक्षित प्रशिक्षक, युवा खेळाडूंना संधी आणि स्पष्ट राष्ट्रीय धोरण आवश्यक असते. एक काळ असा होता की स्पेनकडे उत्कृष्ट खेळाडू होते; पण मोठ्या स्पर्धांमध्ये अंतिम टप्प्यावर तो संघ अपयशी ठरत असे. 'नेहमी दावेदार, पण कधीच विजेता नाही' अशी त्याची ओळख बनली होती, मात्र २००८ च्या युरो चषकापासून स्पेनने आपल्या फुटबॉल संस्कृतीत क्रांतिकारक बदल घडवून आणले. २०१० चा विश्वचषक, २०१२ चा युरो आणि आता पुन्हा २०२६ चे विश्वविजेतेपद हा त्या दीर्घकालीन प्रवासाचा परिणाम आहे. अनेक संघ प्रतिस्पर्ध्यांनुसार आपली शैली बदलतात; पण स्पेनने चेंडूवरील नियंत्रण, अचूक पासिंग, सामूहिक खेळ आणि संयम या बाबींशी कधीही तडजोड केली नाही.

आज भारतासह अनेक देश फुटबॉलमध्ये मोठी स्वप्ने पाहत आहेत. मात्र, केवळ विदेशी प्रशिक्षक नेमणे किंवा काही मोठ्या स्पर्धा आयोजित करणे पुरेसे नाही. स्पेनचा आदर्श सांगतो की, तळागाळापासून मजबूत रचना उभारल्याशिवाय जागतिक यश मिळत नाही. शालेय क्रीडा, प्रशिक्षकांचे प्रशिक्षण, स्थानिक स्पर्धा, आधुनिक सुविधा आणि दीर्घकालीन धोरण या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे विश्वविजेतेपद, या विश्वचषकात स्पेनच्या प्रत्येक खेळाडूने स्वत: पेक्षा संघाला प्राधान्य दिले. वैयक्तिक कौशल्य दाखवण्यापेक्षा संघाच्या विजयासाठी प्रत्येकाने आपली भूमिका प्रामाणिकपणे पार पाडली. यामुळेच स्पेनचा खेळ आकर्षक आणि प्रभावी ठरला. अंतिम सामन्यातही त्यांनी संयम राखत अर्जेंटिनासारख्या बलाढ्य प्रति-स्पर्ध्याला संधीच दिली नाही, अर्जेंटिनाप्रमाणे स्पेन एका मेस्सीवर अवलंबून राहिला नाही, हेही लक्षात घ्यावे लागेल. आजच्या फुटबॉलमध्ये मोठे स्टार खेळाडू संघाला जिंकवतात, अशी धारणा असते. परंतु स्पेनने दाखवून दिले की, संघभावना ही कोणत्याही सुपरस्टारपेक्षा मोठी असते. प्रशिक्षकाने आखलेली रणनीती आणि खेळाडूंनी केलेली तिची काटेकोर अंमलबजावणी हेच त्यांच्या यशाचे रहस्य ठरले. अर्जेंटिनाचा पराभव हा त्यांच्या कमकुवतपणामुळे झाला, असे म्हणणे योग्य ठरणार नाही, अर्जेंटिनाही तितकाच सक्षम आणि लढाऊ संघ होता. मात्र अंतिम सामन्यात स्पेनने अधिक शिस्त, अधिक संयम आणि अधिक अचूकता दाखवली. मोठ्या सामन्यांमध्ये छोट्या चुका महागात पडतात आणि स्पेनने त्या चुका टाळल्या. स्पेनमधील फुटबॉल अकादमी ही केवळ खेळ शिकवण्याची संस्था नसते, ती व्यक्तिमत्व घडवण्याची शाळा असते, खेळाडूंना शिस्त, संघभावना, निर्णयक्षमता आणि दबावाखाली खेळण्याचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे मोठ्या सामन्यांमध्ये ते घाबरत नाहीत; उलट अधिक आत्मविश्वासाने खेळतात, स्पेनच्या क्लब फुटबॉलची ताकदही त्यांच्या राष्ट्रीय यशाचा महत्त्वाचा आधार आहे.

देशांतर्गत स्पर्धा अत्यंत दर्जेदार असल्याने खेळाडूंना सातत्याने उच्च दर्जाचा अनुभव मिळतो, राष्ट्रीय संघाला वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी ही व्यवस्था मोठी मदत करते. झटपट यशाची अपेक्षा न ठेवता संयमाने केलेली गुंतवणूक अखेरीस मोठे फळ देते. आजच्या जगात अनेक क्षेत्रांत तात्कालिक लोकप्रियतेला अधिक महत्त्व दिले जाते. मात्र स्पेनने दाखवून दिले की, खरे यश शांतपणे, सातत्याने आणि शिस्तबद्ध पद्धतीने उभे राहते. प्रत्येक पिढीने पुढच्या पिढीसाठी मजबूत पाया घातला, म्हणूनच स्पेन पुन्हा जगाचा सर्वोत्तम संघ बनला. स्पेनचा हा विजय केवळ फुटबॉलचा नाही, तर दूरदृष्टीचा, व्यवस्थापनाचा आणि उत्कृष्टतेवर असलेल्या अढळ विश्वासाचा विजय आहे.

# लोकसंख्या दिन कार्यक्रम लोक जागृतीची चळवळ व्हावी - डॉ. विजय गोरडे

ब्रह्मपुरी/का.प्र.

'भारताची लोकसंख्या ही आज चीनला मागे टाकून जगात प्रथम क्रमांकावर आहे. भारत



जगात सर्वात तरुण देश पण अजूनही विकसनशील देश आहे. महाशक्ती व्हायला बराच काळ बाकी आहे. काही ठिकाणी वाढलेली लोकसंख्या अडसर तर काही ठिकाणी ती आपली ताकद आहे. जागृत तरुण असेल तर विकसनशील देश लवकर विकसित होईल म्हणून हा दिवस लोक जागृतीसाठीची चळवळ व्हावी' असे विवेचन महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरीचे डॉ विजय गोरडेंनी केले. ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात 'लोकसंख्या दिन 'कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

विचारपीठावर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर तर अतिथी म्हणून डॉ राजेंद्र डांगे, डॉ रेखा मेश्राम, डॉ भास्कर लेनगुरे, डॉ विवेक नागभीडकर, डॉ प्रकाश वट्टी इत्यादी उपस्थित होते. यावेळी डॉ डांगे व अध्यक्षांनी मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक डॉ प्रकाश वट्टी, संचालन डॉ विवेक नागभीडकर तर आभार प्रदर्शन डॉ भास्कर लेनगुरेंनी केले. यशस्वीतेसाठी डॉ के.एम.शर्मा, प्रा.आकाश मेश्राम, प्रा. धीरज आतला, प्रा. बंडू गेडाम, डॉ अजित खाजगीवाले यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला डॉ धनराज खानोरकर, डॉ असलम शेख, डॉ मोहन कापगते, डॉ वर्षा चंदनशिवे, डॉ राजू आदे, डॉ सुनिल चौधरी, डॉ युवराज मेश्राम, डॉ किशोर नाकतोडे, डॉ योगेश ठावरी, डॉ पद्माकर वानखडे, डॉ अतुल येरपुडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

**जल है तो कल है...**

# आम. बंटी भांगडिया यांचा वाढदिवस साजरा

## वाढदिवसानिमित्य रूग्णांना फळवाटप, वृक्षारोपण आदी सामाजिक उपक्रम

ब्रह्मपुरी/का.प्र.

चंद्रपूर जिल्ह्याचे भाजप नेते तथा चिमूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार



कीर्तिकुमार उर्फ बंटी भांगडिया यांच्या वाढदिवसानिमित्त ब्रह्मपुरी तालुका भाजप व मित्रपरिवाराच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून त्यांचा वाढदिवस साधेपणाने आणि समाजोपयोगी पद्धतीने साजरा करण्यात आला.

रविवार, दि. १९ जुलै रोजी आयोजित कार्यक्रमाची सुरुवात ब्रह्मपुरी ग्रामीण उपजिल्हा रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांना फळवाटप करून करण्यात आली. त्यानंतर खेडमक्ता परिसरातील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिराव फुले यांच्या स्मारकाला अभिवादन करण्यात आले. याच परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. तसेच चांदली रोडवरील निर्मल माता आश्रम परिसरातही वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी आमदार बंटी भांगडिया यांच्या सामाजिक बांधिलकी, विकासाभिमुख कार्यशैली आणि लोकहिताच्या विविध उपक्रमांचा गौरव केला.

या प्रसंगी माजी जि.प. उपाध्यक्ष तथा ब्रह्मपुरी विधानसभा भाजप नेते कृष्णलाल सहारे, ब्रह्मपुरी न.प. माजी बांधकाम सभापती तथा ज्येष्ठ भाजपा नेते विलास विखार, सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक सिद्धेश्वर भर्रे, सेवा सहकारी संस्था किन्हीचे माजी अध्यक्ष सुरेश दर्वे, भाजप मंडल अध्यक्ष सुधीर दोनाडकर, सोनेगावचे माजी उपसरपंच मोरेश्वर दर्वे, इंजी. संदीप तुपट, इंजी. रोशन नवघडे, कंत्राटदार गणेश पिलारे, ब्रम्हपुरी पंचायत समितीचे माजी उपसभापती नामदेव लांजेवार, कंत्राटदार ईश्वर प्रधान, अक्षय चहांदे, ब्रम्हपुरी पंचायत समितीचे माजी उपसभापती विलास उरकुडे, सामाजिक कार्यकर्ते वैभव बगमारे, राजू उरकुडे ब्रम्हपुरी, राजू चौधरी जेष्ठ भाजपा कार्यकर्ते, चिंतामणी जोशी भाजपा प्रदेश कार्यकारिणी, नंदुजी राऊत, बालाजी राईस मिलचे संचालक हितेश नवलाखे, अमित मेंडुले, अनिल भुते, घोरमोडे सर उपस्थित होते.

## विनोदिनी

*ऑफीसमध्ये असतांना मी पत्नीचा फोन कट करण्या अगोदर म्हणालो, 'मी मीटिंगमध्ये आहे, मी तुला नंतर फोन करेन.'*
*त्यानंतर लगेच, मला माझ्या शेजारणीचा फोन आला.*
*शेजारीण : तू मोकळा आहेस का? मी तुला त्रास तर दिला नाही ना? मला एक काम होते?*
*मी : सांग, काय आदेश आहे...*
*शेजारीण : माझे काम नाही पण तुमच्या बायकोला काम आहे, कृपया तिच्याशी बोला...*
*बायको : संध्याकाळी घरी येताना आयोडेक्स घेऊन या.*

# अवैध सावकारी करणाऱ्या अमरसिंह टाकवर ब्रम्हपुरी पोलीसांत गुन्हा दाखल

## घर झडतीमध्ये डायऱ्या आणि कोरे चेक जप्त

ब्रम्हपुरी/ प्रतिनिधी :

ब्रम्हपुरी शहरात विनापरवाना आणि अवैध सावकारी करून कर्जदारांना धमकावणाऱ्या आणि मानसिक त्रास देणाऱ्या अमरसिंग लक्ष्मणसिंग टाक (वय ५८ वर्ष, रा. गुरुद्वाराजवळ, फुलेनगर, ब्रम्हपुरी) याच्याविरुद्ध ब्रम्हपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ब्रम्हपुरीचे स्वप्नील बाळासाहेब पाटील (वय ४८ वर्षे) यांच्या लेखी तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली असून, आरोपीच्या घरातून अवैध सावकारीशी संबंधित महत्वाचे दस्तऐवज जप्त करण्यात आले आहेत.

काही दिवसांपूर्वी पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी येथून सहाय्यक निबंधक कार्यालयाला पत्र प्राप्त झाले होते. त्यासोबत ब्रम्हपुरी येथील रहिवासी पूजा धम्मदीप हुमने आणि रमेश गंगाधर बोबडे यांनी अमरसिंग टाक हा अवैध सावकारी करून मानसिक त्रास देत असल्याबाबतचे तक्रार अर्ज जोडले होते. या तक्रारींच्या अनुषंगाने सहाय्यक निबंधक कार्यालयाने दोन्ही अर्जदारांना बोलावून त्यांची खातरजमा केली व १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर त्यांचे स्वयंघोषणापत्र लिहून घेतले.

रमेश गंगाधर बोबडे (वय ६६ वर्षे) यांनी गृहउपयोगी वस्तूंच्या व्यवसायासाठी जानेवारी २०२६ मध्ये अमरसिंग टाक याच्याकडून १,२५,००० रुपये रोख घेतले होते. यासाठी दररोज २,७५० रुपये प्रमाणे ६० दिवसांत रक्कम परत करण्याचे ठरले होते. बोबडे यांनी आतापर्यंत ६५,५५० रुपये परत केले आहेत. मात्र, अमरसिंग टाक हा मुद्दल १,२५,००० रुपये आणि रोजचे २,७५० रुपये याप्रमाणे संपूर्ण पैशांसाठी दबाव आणून शिवीगाळ व धमक्या देत होता. तसेच

सौ. पूजा धम्मदीप हुमने (वय २९ वर्षे) यांनी सुद्धा मुलाच्या आजारपणासाठी त्यांनी नोव्हेंबर २०२५ मध्ये ३०,००० रुपये ऑनलाइन घेतले होते. आतापर्यंत त्यांनी ३१,००० रुपये (रोख व ऑनलाइन) परत केले आहेत. तरीही अमरसिंग टाक हा त्यांच्यावर अजून ७२,००० रुपये बाकी असल्याचे सांगून पैसे वसुलीसाठी मानसिक त्रास व धमक्या देत होता.

मिळालेल्या तक्रारींच्या आधारे महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या कलम १६ नुसार सहाय्यक निबंधक कार्यालयाने एक शोध पथक तयार केले. दोन पंचांची नियुक्ती करून आणि पोलीस बंदोबस्त घेऊन १४ जुलै २०२६ रोजी अमरसिंग टाक याच्या घराची झडती घेण्यात आली. त्यात लोकांना व्याजाने पैसे दिल्याबाबतच्या नोंदी असलेल्या ११ डायऱ्या (नोंदवह्या).

दैनंदिन वसुलीच्या नोंदी असलेले एक पासबुक आणि एक कोरे लहान पासबुक, नोंदवह्यांमध्ये सापडलेले ०६ स्वाक्षरी केलेले कोरे चेक (ज्यावर रक्कम व दिनांक नमूद नव्हता) आदी दस्तावेज त्यांना सापडले.

अमरसिंग लक्ष्मणसिंग टाक हा कोणत्याही वैध परवान्याशिवाय (लायसन्स) अवैध सावकारी व्यवसाय करत असल्याचे तपासात स्पष्ट झाले. याप्रकरणी सहाय्यक निबंधक स्वप्नील पाटील यांच्या लेखी तक्रारीवरून आरोपी अमरसिंग टाक विरुद्ध महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम ३९ आणि भारतीय न्याय संहिताच्या संबंधित कलमांन्वये ब्रम्हपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# लोकवर्गणीतून समता कॉलनीतील ग्राऊंडचा कायापालट

## ग्राऊंडमध्ये वॉकिंग ट्रॅक निर्मितीसह वृक्षारोपण



ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक समता कॉलनी येथील नागरिकांनी रविवारी (दिनांक १९ जुलै) सामाजिक बांधिलकी आणि एकतेचे एक उत्कृष्ट उदाहरण समोर आणले आहे. प्रशासनाच्या मदतीची वाट न बघता, समता कॉलनीतील नागरिकांनी एकत्र येत लोकवर्गणीच्या माध्यमातून समता कॉलनीतील मैदानाचा (ग्राउंड) पूर्णपणे कायापालट केला.

या मोहिमेत नागरिकांनी गोळा केलेल्या लोकवर्गणीतून ट्रॅक्टरच्या सहाय्याने मैदानावर मोठ्या प्रमाणात मुरूम टाकला. संपूर्ण मैदान व्यवस्थित सपाट करून ते खेळण्यायोग्य व वापरण्यायोग्य तयार करण्यात आले.

केवळ मैदान तयार करूनच नागरिक थांबले नाहीत, तर आरोग्याचे महत्त्व ओळखून त्यांनी या मैदानाच्या कडेने मॉर्निंग वॉक (सकाळची सफर) करणाऱ्यांसाठी एक सुंदर वॉकिंग ट्रॅकदेखील तयार केला. तसेच, परिसराचे सौंदर्य वाढवण्यासाठी आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मैदानाभोवती वृक्षारोपण करून परिसर हिरवागार करण्याचा संकल्प केला. नागरिकांच्या या 'स्वयंस्फूर्ती' आणि 'एकतेचे' संपूर्ण ब्रम्हपुरी शहरात कौतुक होत असून, इतरांसाठी हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी ठरत आहे.

# तालुकास्तरीय शालेय पूर्वपरीक्षा मार्गदर्शन शिबीर संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

जवाहर नवोदय परीक्षा मार्गदर्शन केंद्र चंद्रपूर अंतर्गत ब्रम्हपुरी तालुक्यातील इयत्ता ४ थी , ५ वी, ७ वी व ८ वी मधील मराठी, हिंदी व इंग्रजी माध्यमातील शासकीय, खाजगी अनुदानित व इंग्रजी कॉन्व्हेन्ट स्कूल शाळेतील जवाहर नवोदय प्रवेश परीक्षा, सैनिक स्कूल परीक्षा व शिष्यवृत्ती परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित तालुकास्तरीय नवोदय, शिष्यवृत्ती व सैनिक स्कूल परीक्षापूर्व मार्गदर्शन शिबिर रविवार, दि. १९ जुलैला डॉ. आंबेडकर विद्यालय, ब्रम्हपुरी येथे पार पडले.



या शिबिराचे उद्घाटन प्रमुख अतिथी केंद्र संचालिका आम्रपाली बागेसर, पत्रकार गोवर्धन दोनाडकर व मुख्याध्यापक नन्नावरे व तज्ज्ञ मार्गदर्शक शिक्षक भारत वाट सर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या शिबिरात तज्ज्ञ मार्गदर्शक वाट यांनी इयत्ता ५ वी व ८ वी जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा, सैनिक स्कूल परीक्षा आणि इयत्ता ४ थी व ७ वी शिष्यवृत्ती परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिका स्वरूप व परीक्षा अभ्यास कसा करावा या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

तत्पूर्वी, उपस्थित अतिथींचे आयोजकांच्या वतीने पुष्पगुच्छ व पेन डायरी देऊन स्वागत करण्यात आले. या शिबिरात विविध शाळांतील विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाहरुख शेख, विशू मेश्राम, शिपाई योगेश मेहेर आदींनी सहकार्य केले.

# शिक्षकांना मतदार यादीतील हलगर्जीपणा भोवला

## जिल्हाधिकाऱ्यांची पाच कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई

चंद्रपूर/प्रतिनिधी

मतदार यादीची तयारी, पुनरावलोकन, दुरुस्ती तसेच नियमानुसार मतदारांची नावे समाविष्ट करणे अथवा वगळण्याच्या निवडणूकविषयक अधिकृत कर्तव्यात गंभीर निष्काळजीपणा आणि हलगर्जीपणा केल्याचे निष्पन्न झाल्याने चंद्रपुरातील दोन शिक्षकांसह वेकोलिच्या तीन कर्मचाऱ्यांना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या आदेशान्वये तात्काळ निलंबित करण्यात आले आहे.

निलंबित करण्यात आलेल्यांमध्ये मुरलीधर बागला हायस्कूल, चंद्रपूर येथील सहाय्यक शिक्षक आर.बी. येसांबरे, चंद्रपूर महापालिका शाळेतील सहाय्यक शिक्षक आनंद गेडाम तसेच वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (वेकोलि) क्षेत्रीय मुख्यालयातील सोनू ढुमणे, किरण रामटेके आणि मनोज शेंडे यांचा समावेश आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी ही कारवाई केली. मतदार यादीशी संबंधित निवडणूक कर्तव्य पार पाडताना झालेल्या गंभीर निष्काळजीपणाच्या पार्श्वभूमीवर संबंधित कर्मचाऱ्यांविरुद्ध आली असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

नियमित वाचा... अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार

# आंतरराष्ट्रीय परिषद ‘आयकॉन-२०२६’मध्ये डॉ. अरविंद मुंगोलेंना ‘एमिनेंट सायंटिस्ट अवॉर्ड’ प्रदान

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेद्वारे संचालित नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्राचे प्रा.डॉ.अरविंद जे.मुंगोले यांना ‘आयकॉन-२०२६’ (International Conference on Innovative Trends in Climate-Resilient and Adaptive Agriculture) या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये वनस्पतिशास्त्र व त्यास संलग्न शाखांमधील संशोधन क्षेत्रातील सातत्यपूर्ण उत्कृष्ट कार्य आणि उल्लेखनीय योगदानाबद्दल ‘एमिनेंट सायंटिस्ट अवॉर्ड’ प्रदान करून गौरविण्यात आले.

या मानाच्या पुरस्कारामुळे नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्था तसेच नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाच्या शैक्षणिक, संशोधन व वैज्ञानिक कार्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली असून संस्थेच्या व महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. ही आंतरराष्ट्रीय परिषद दि.१८ ते २० जुलै २०२६ या कालावधीत पार पडली.या परिषदेचे आयोजन सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चर रिसर्च अँड सोशल डेव्हलपमेंट (भारत), सदर्न फेडरल युनिव्हर्सिटी, रोस्तोव-ऑन-डॉन (रशिया) आणि हार्वेस्ट हार्मोनियस (अमेरिका) यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. ज्ञानाची देवाणघेवाण,



संशोधनातील सहकार्य आणि नवसंशोधनाला चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित या परिषदेत ४०० हून अधिक संशोधक, वैज्ञानिक, प्राध्यापक, संशोधन विद्यार्थी, उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ, उद्योजक तसेच विविध देशांतील प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला.

डॉ. मुंगोले यांना यापूर्वीही यंग सायंटिस्ट अवॉर्ड, डिस्टिंग्विश्ड सायंटिस्ट अवॉर्ड तसेच बेस्ट पेपर प्रेझेंटेशन अवॉर्ड यांसारख्या प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या नावे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधन नियतकालिकांमध्ये ६० हून अधिक संशोधन लेख प्रकाशित असून ७ पेटंट्स तसेच १० पुस्तके प्रकाशित झाली आहेत. हा सन्मान स्वीकारल्यानंतर डॉ.अरविंद मुंगोले यांनी या यशाचे श्रेय आपल्या आई-वडिलांच्या आशीर्वादाला, कुटुंबीयांच्या सातत्यपूर्ण सहकार्य व प्रोत्साहनाला, संस्थेच्या व्यवस्थापनाला, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, संशोधक तसेच विद्यार्थ्यांच्या पाठबळाला दिले. हा सन्मान सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांचा, प्रेरणेचा आणि विश्वासाचा परिपाक असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी आपल्या आई-वडिलांचे, कुटुंबातील सर्व सदस्यांचे, सहकाऱ्यांचे, विद्यार्थ्यांचे तसेच संस्थेचे मन:पूर्वक आभार मानले. भविष्यातही शिक्षण, संशोधन आणि वैज्ञानिक नवोपक्रमाच्या क्षेत्रात पूर्ण समर्पणाने कार्य करत राहणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या उल्लेखनीय यशाबद्दल नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष स्नेहलता भैया, उपाध्यक्ष ॲड. प्रकाश भैया, सचिव अशोक भैया, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी डॉ. अरविंद मुंगोले यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी शैक्षणिक, संशोधन व वैज्ञानिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# किडनी तस्करी प्रकरणातील आरोपी डॉ. रविंद्रपाल सिंह यांचा जामीन फेटाळला

## कथित सुत्रधार डॉ. राजरत्नम गोविंदस्वामी अद्याप फरार, शोधमोहीम सुरूच

ब्रम्हपुरी/का.प्र.

बहुचर्चित किडनी तस्करी प्रकरणातील आरोपी डॉ. रविंद्रपाल सिंह यांना जिल्हा व सत्र न्यायालयाने मोठा दणका देत त्यांचा जामीन अर्ज फेटाळून लावला आहे. गुन्ह्यांचे गांभीर्य, उपलब्ध पुरावे आणि तपासाची सद्यास्थिती लक्षात घेऊन न्यायालयाने त्यांना कोणताही दिलासा देण्यास नकार दिल्याने त्यांचा तुरुंगातील मुक्काम आणखी वाढला आहे.




किडनी प्रत्यारोपणाच्या नावाखाली अवैध अवयव व्यापाराचे जाळे उघडकीस आल्यानंतर या प्रकरणाने राज्यासह देशभरात खळबळ उडवून दिली होती. तपासा दरम्यान प्रत्यारोपणासाठी अवयव बनावट कागदपत्रांचा वापर, संशयास्पद आर्थिक व्यवहार आणि प्रक्रियेतील गंभीर अनियमितता समोर आल्याचा दावा तपास यंत्रणांनी केला आहे. या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे. याचाही शोध पोलिसांकडून घेतला जात आहे.

डॉ. रविंद्रपाल सिंह यांनी तपास जवळपास पूर्णत्वास आल्याचे कारण देत जामिनासाठी जिल्हा व सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता. मात्र, सरकारी पक्षाने गुन्ह्याचे स्वरूप अत्यंत गंभीर असून आरोपीला जामीन दिल्यास तपासावर परिणाम होण्याची शक्यता असल्याचा युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने जामीन अर्ज नामंजूर केला.

दरम्यान, या प्रकरणातील कथित सूत्रधार म्हणून समोर आलेले डॉ. राजरत्नम गोविंदस्वामी अद्याप फरार आहेत. त्यांना अटक करण्यासाठी पोलिसांकडून विविध राज्यांमध्ये शोधमोहीम राबविण्यात येत असून अनेक ठिकाणी छापेमारी सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. मात्र, अद्याप त्यांचा ठावठिकाणा लागलेला नाही.

या प्रकरणातील आर्थिक व्यवहारांची साखळी, अवयव प्रत्यारोपणासाठी वापरण्यात आलेली कागदपत्रे, रुग्ण वा दात्यांची माहिती तसेच संबंधित व्यक्तींची भूमिका यांचा तपास सुरू आहे. फरार आरोपीला अटक झाल्यानंतर या अवैध रॅकेटच्या कार्यपद्धतीबाबत आणखी महत्त्वाचे धागेदोरे समोर येण्याची शक्यता तपास यंत्रणांनी व्यक्त केली आहे. किडनी तस्करी प्रकरणातील तपासाचा वेग वाढला असून पुढील काही दिवसांत आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapuri samachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315

# रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी अधिकाऱ्यांना निर्देश देण्याचे आम. मुनगंटीवारांना साकडे

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी हे शहर पूर्व विदर्भातील शिक्षणाचे माहेरघर समजले जाते. या ठिकाणी ब्रह्मपुरी



तालुक्यातूनच नव्हे तर आजूबाजूच्या तालुक्यातून सुद्धा विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. परंतु या तालुक्याच्या उत्तर आणि पूर्व भागातून वैनगंगा नदी वाहत असल्यामुळे आणि वैनगंगेची रेती सर्वदूर प्रसिद्ध असल्यामुळे नदीतील रेती ओरबडण्याचे काम रात्रंदिवस चालत असते. यामुळे तालुक्यातील सर्वच रस्ते खराब झालेले आहेत. त्यावरून नागरिकांना, शाळकरी मुलांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. आतापर्यंत अनेक अपघात झाले असून मनुष्यहानी सुद्धा झालेली आहे.

या सर्व समस्यांपैकी अतिशय महत्त्वाच्या असलेल्या ब्रह्मपुरी- मेंडकी -एकारा प्रमुख जिल्हा मार्ग त्वरित दुरुस्ती करणे अत्यावश्यक आहे तसेच ब्रह्मपुरी पवनी मार्गावरील ब्रह्मपुरी ते कहाली खंडाळापर्यंतचा रोड सुद्धा खड्डेमय झाला आहे तसेच ब्रह्मपुरी- अहेर नवरगाव या मार्गावरून शेतकरी भाजीपाला ब्रह्मपुरी मार्केटमध्ये आणत असल्यामुळे आणि विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा मार्ग सुद्धा अतिशय महत्त्वाचा असल्यामुळे आणि तो अत्यंत खराब झालेला असल्यामुळे या तीनही मार्गांची दुरुस्ती आणि पक्के काम त्वरित होणे संबंधाने संबंधित प्रशासकीय अधिकारी यांना कार्य प्रवृत्त करावे यासाठी प्रा प्रकाश बगमारे,प्रदेश सचिव, भाजपा ओबीसी मोर्चा यांच्या नेतृत्वात संतोषजी अतकरे, स्वीय सहाय्यक सुधीर मुनगंटीवार यांचे कार्यालयात जाऊन निवेदन सादर केले. याप्रसंगी घनश्याम सूर्यवंशी, घनश्याम कावळे तसेच विकास बनपूरकर व अन्य उपस्थित होते. लोकहिताच्या या कार्याला लोकनेते सुधीरभाऊ मुनगंटीवार तातडीने पूर्ण करतील अशी अपेक्षा याप्रसंगी चर्चेदरम्यान व्यक्त करण्यात आली.

नियमित वाचा
अर्धसाप्ताहिक
ब्रम्हपुरी समाचार

# गोसेखुर्दच्या उजव्या कालव्याची आमदार विजय वडेट्टीवार यांच्याकडून पाहणी

## अपूर्ण कामांबद्दल अधिकाऱ्यांना फटकारले

ब्रम्हपुरी/का.प्र.

गोसेखुर्द धरणाचे पाणी उजव्या कालव्याला तातडीने सोडण्यात यावे, अन्यथा कार्यकारी अभियंत्यांच्या कार्यालयाला घेराव घालून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा विधिमंडळ काँग्रेस पक्षनेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी दोन दिवसांपूर्वी दिला होता. त्यांच्या आक्रमक भूमिकेची दखल घेत प्रशासनाने उजव्या कालव्यात पाणी सोडले. मात्र पाणी सोडले आहे म्हणून समाधान न मानता, प्रत्यक्षात पाणी शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचत आहे की नाही, याची खात्री करण्यासाठी विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते, आमदार विजय वडेट्टीवार यांनी ब्रम्हपुरी तालुक्यातील खेडमक्ता व मरारमेंढा गावानजीकच्या गोसेखुर्द उजव्या कालव्याची पाहणी केली.



पाहणीदरम्यान कालव्यावरील अनेक ठिकाणी बांधकामे अपूर्ण असल्याचे निदर्शनास येताच आमदार वडेट्टीवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना चांगलेच फटकारले. अपूर्ण कामांमुळे शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्याला अडथळा निर्माण होणार असेल, तर ते अजिबात खपवून घेतले जाणार नाही. सर्व कामे तातडीने पूर्ण करून कालव्यातील पाण्याचा प्रवाह अखंडित ठेवावा, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

यावेळी आमदार वडेट्टीवार म्हणाले, मी जलसंपदा राज्यमंत्री असताना गोसेखुर्द उजव्या कालव्याच्या कामासाठी तब्बल ५ हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला. उजव्या कालव्याचे काम ऑक्टोबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याची मुदत आहे. मात्र आजपर्यंत केवळ १५ टक्केच काम पूर्ण झाले आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. प्रशासनाने आता तरी झोपेतून जागे होऊन कामाला वेग द्यावा. ऑक्टोबर २०२६ पर्यंत कालव्याचे काम पूर्ण झाले नाही, तर शेतकऱ्यांच्या हक्कासाठी मोठे जनआंदोलन उभारले जाईल. शेतकऱ्यांच्या भवितव्याशी खेळ करणाऱ्या निष्काळजीपणाला मी गप्प बसून पाहणार नाही. प्रत्येक शेतापर्यंत सिंचनाचे पाणी पोहोचविण्यासाठी आवश्यक ती प्रत्येक लढाई लढली जाईल.

पाहणीदरम्यान त्यांनी कालव्यातील पाण्याच्या प्रवाहाची प्रत्यक्ष पाहणी करून अधिकाऱ्यांकडून कामाचा आढावा घेतला. ज्या ठिकाणी बांधकामे अपूर्ण आहेत, ती युद्धपातळीवर पूर्ण करून पाण्याचा पुरवठा अखंडित ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच कालव्याच्या शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यालाही पुरेशा प्रमाणात पाणी मिळेल, यासाठी नियोजनबद्ध कार्यवाही करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी घोडाझरी कालवे विभागाचे कार्यकारी अभियंता सुहास मोरे तसेच गोसेखुर्द उजवा कालवा विभागाचे सहाय्यक अभियंता जितेंद्र मडावी, कृउबा सभापती प्रभाकर सेलोकर, न.प.उपाध्यक्ष डॉ.नितीन उराडे उपस्थित होते. गोसेखुर्द प्रकल्पाचा लाभ शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचावा, सिंचनासाठी मुबलक पाणी उपलब्ध व्हावे आणि रखडलेल्या कामांना गती मिळावी, यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, असा स्पष्ट इशारा आम. वडेट्टीवार यांनी दिला आहे.

# ब्रम्हपुरी पोलीसांकडून आतंरजिल्हा चोरट्या टोळीचा पर्दाफाश, ३ गुन्हे उघडकीस

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक गुन्हे शोध पथकाने अत्यंत कौतुकास्पद कामगिरी बजावत एका आंतरजिल्हा चोरट्या टोळीतील सराईत विधीसंघर्ष बालकांना जेरबंद केले आहे. या कारवाईमुळे ब्रम्हपुरीतील एका धाडसी घरफोडीसह चंद्रपूर जिल्ह्यातील अन्य दोन दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना मोठे यश आले आहे.

पटेलनगर ब्रम्हपुरी येथील रहिवासी आणि उपहारगृह व्यावसायिक विरल मुकेश हलवादीया (वय ३२ वर्षे) यांचे सावरकर चौक येथे स्विटमार्टचे



दुकान आहे. दि. १४ जुलै २०२६ च्या रात्री अज्ञात चोरांनी त्यांच्या दुकानाच्या शटरचे कुलूप तोडून गल्ल्यातील ६ ते ७ हजार रुपये रोख रक्कम लंपास केली होती. याप्रकरणी विरल हलवादीया यांच्या फिर्यादीवरून ब्रम्हपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५६६/२०२६ कलम ३०५ (अ), ३३१ (४) भा.न्या.सं. (BNS) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

गुन्हा दाखल होताच ब्रम्हपुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांच्या मार्गदर्शनाखाली डि.बी. पथकाने तातडीने तपास चक्रे फिरवली. पोलिसांनी गुन्ह्यातील आरोपी आणि चोरी गेलेल्या मालाचा शोध घेण्यासाठी तांत्रिक पद्धतीचा अवलंब केला. या दरम्यान, पथकाला खात्रीशीर बातमीदाराकडून गोपनीय माहिती मिळाली की, या गुन्ह्यात सामील असलेले तीन विधीसंघर्ष बालक (अल्पवयीन बालक) हे गडचिरोली जिल्ह्यातील आहेत. पोलिसांनी तात्काळ सापळा रचून तिन्ही बालकांना ताब्यात घेतले.

ताब्यात घेतलेल्या बालकांना विश्वासात घेऊन सखोल विचारपूस केली असता, त्यांनी ब्रम्हपुरीतील स्विटमार्टच्या दुकानफोडीची कबुली दिली. पोलिसांनी त्यांच्याकडून चोरी गेलेली रोख रक्कम हस्तगत केली. एवढेच नव्हे तर, अधिक तपासादरम्यान या टोळीतील एका बालकाने चंद्रपूर शहरातून दोन दुचाकी वाहने चोरल्याची धक्कादायक कबुली दिली. त्यानुसार पोलिसांनी एकूण ९०,०००/- रुपये किमतीच्या दोन दुचाकी जप्त केल्या आहेत. यात १) निळ्या रंगाची मोपेड (किंमत अंदाजे ४०,०००/- रुपये) क्रमांक MH 34 CB 7225 २) काळ्या रंगाची स्प्लेंडर प्रो मोटरसायकल (किंमत अंदाजे ५०,०००/- रुपये) क्रमांक MH 31 DN 7912 यांचा समावेश आहे. या कारवाईमुळे ब्रम्हपुरी पोलीस ठाण्यातील घरफोडीच्या गुन्ह्यासोबतच रामनगर पोलीस ठाणे (चंद्रपूर) अंतर्गत दाखल असलेले दोन दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे.

सदर उल्लेखनीय व धडक कामगिरी मा. पोलीस अधीक्षक आयुष नोपानी सर, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी (ब्रम्हपुरी) दिनकर ठोसरे सर, आणि पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले सर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली पार पडली. गुन्हे शोध पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज खडसे, पोलीस हवालदार मुकेश गजबे, पोलीस अंमलदार वशिष्ठ रंगारी, प्रवीण भिवगडे, निलेश तुमसरे, इर्शाद खान आणि स्वप्नील पळसपगार यांनी या यशस्वी कारवाईत मोलाची भूमिका बजावली. ब्रम्हपुरी पोलिसांच्या या तत्पर कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता

www.bramhapuri samachar.com/bs

या ऑनलाईन साईटला भेट द्या

बातम्यांकरीता संपर्क :

मो. 9503100964
मो. 8275715315

... QUOTES ...

"When one door closes, sometimes we need to turn the knob to open another."
- J.A. Tran

चारोळी

बफेमध्ये जेवतांना ते ढब्याने
प्लेटभोवती पाणी फिरवतात...
बियर सोबत पार्लेबिस्किट आणि
पुरणपोळी सोबत कैरी खातात...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# पेठवार्ड येथे आढळले दुर्मिळ खवल्या मांजर

## वनविभाग व वन्यजीवप्रेमींच्या सतर्कतेमुळे सुरक्षित अधिवासात सुटका

ब्रह्मपुरी/का.प्र.

पेठवार्ड, ब्रम्हपुरी येथील रहिवासी नामदेवजी उरकुडे यांच्या घरी सोमवारी रात्री सुमारे ९.३० वाजेच्या सुमारास एक दुर्मिळ 'खवल्या मांजर' (पँगोलिन) आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. मात्र, वनविभाग आणि स्थानिक वन्यजीवप्रेमींच्या तत्परतेमुळे या दुर्मिळ प्राण्याला सुरक्षितरीत्या ताब्यात घेऊन त्याला जीवनदान देण्यात यश आले आहे.



खवल्या मांजर हा जगातील अत्यंत दुर्मिळ आणि एकमेव असा सस्तन प्राणी आहे, ज्याच्या शरीरावर कठीण खवले असतात. नावामध्ये 'मांजर' असले तरी याचा मांजराशी किंवा मांजराच्या प्रजातीशी काहीही संबंध नाही. उरकुडे यांच्या घरी खवल्या मांजर असल्याची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी आणि वन्यजीवप्रेमींनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. 'नेचर एन्व्हायर्नमेंट अँड वाइल्डलाईफ ऑर्गनायझेशन'च्या सहकार्याने अत्यंत कौशल्याने बचाव मोहीम राबवून या प्राण्याला सुरक्षितपणे ताब्यात घेण्यात आले. आवश्यक वैद्यकीय तपासणीनंतर त्याला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सुरक्षितरीत्या मुक्त करण्यात आले. या बचाव मोहिमेत वन्यजीवप्रेमी पंकज माकोडे, आरएफओ अरुण कन्नमवार, बायोलॉजिस्ट राकेश आहुजा, बीट गार्ड पंकज चुन्हे तसेच सर्पमित्र अश्विन उपासे यांनी मोलाचा सहभाग नोंदवला.

खवल्या मांजराला वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ नुसार 'अनुसूची १' अंतर्गत वाघ-सिंहाप्रमाणेच सर्वोच्च संरक्षण देण्यात आले आहे. याची शिकार किंवा विक्री करणे हा गंभीर आणि अजामीनपात्र अपराध आहे. त्यामुळे कायद्यांतर्गत अत्यंत दुर्मिळ आणि उच्च दर्जाचे संरक्षण असलेला प्राणी आहे. या प्राण्याच्या संपूर्ण शरीरावर संरक्षणासाठी कठीण 'केराटीन' नावाच्या प्रथिनापासून बनलेले खवले असतात. संपूर्ण शरीर खवल्यांनी आच्छादलेला हा जगातील एकमेव सस्तन प्राणी मानला जातो. हा प्राणी प्रामुख्याने निशाचर (रात्री फिरणारा) असून दिवसा पोकळ झाडे किंवा जमिनीतील बिळांमध्ये वास्तव्य करतो. याचे मुख्य अन्न मुंग्या आणि वाळवी हे आहे. आपल्या लांब आणि चिकट जिभेच्या साहाय्याने तो अन्न शोधतो. खवल्या मांजर वर्षाला सुमारे ७ ते ८ कोटी कीटक-वाळवी खाते. त्यामुळे पिकांची आणि झाडांची वाळवीपासून बचत होते. म्हणूनच याला 'नैसर्गिक पेस्ट कंट्रोलर' किंवा 'शेतकऱ्याचा मित्र' म्हटले जाते. पर्यावरणातील कीटकांचे प्रमाण नियंत्रणात ठेवून जैविक समतोल राखण्यात या प्राण्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.धोका जाणवताच हा प्राणी स्वत:चे शरीर एखाद्या फुटबॉल किंवा चेंडूसारखे गोल गुंडाळून घेतो. त्यामुळे शिकारी प्राण्यांना किंवा हिंस्त्र जनावरांना याच्यावर हल्ला करणे अशक्य होते.

'खवल्या मांजर किंवा इतर कोणताही दुर्मिळ वन्यप्राणी नागरी वस्तीत आढळल्यास त्याला घाबरून न जाता अथवा कोणतीही इजा न पोहोचवता, तात्काळ वनविभागाशी किंवा स्थानिक वन्यजीव संरक्षण संस्थांशी संपर्क साधावा,' असे आवाहन ब्रह्मपुरी येथील पर्यावरणप्रेमी पंकज माकोडे यांनी केले आहे.

Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.

# सोंद्रीजवळ चिखलाचे साम्राज्य, दिवसभरात १०० हून अधिक दुचाकी घसरल्या

## चालकाच्या प्रसंगावधानामुळे एसटी बसचा मोठा अनर्थ टळला

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील ब्रम्हपुरी-पिंपळगाव मार्गावरील सोंद्री गावाजवळ शुक्रवारी दिवसभर वाहतुकीची अत्यंत दुरवस्था झाली होती. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात साचलेल्या चिखलामुळे हा मार्ग वाहनचालकांसाठी एक धोकादायक 'डेथ ट्रॅप' बनला आहे. निसरड्या रस्त्यामुळे दिवसभरात तब्बल शंभरहून अधिक दुचाकी वाहने घसरून अपघातग्रस्त झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. सुदैवाने हे सर्व अपघात किरकोळ स्वरूपाचे असल्याने मोठी जीवितहानी टळली असली, तरी वाहनचालकांमध्ये तीव्र संताप व भीतीचे वातावरण आहे.



प्राप्त माहितीनुसार, शुक्रवारी सायंकाळी ५:३० वाजण्याच्या सुमारास याच चिखलामुळे एक मोठा अनर्थ घडता घडता राहिला. विद्यार्थ्यांना पिंपळगाव येथे सुखरूप सोडल्यानंतर ब्रम्हपुरीकडे परतणारी एक बस सोंद्री गावाजवळ चिखलावरून घसरली आणि थेट रस्त्याच्या कडेला गेली. अपघात झाला त्या जागेच्या अगदी शेजारीच महावितरणचा जिवंत विद्युत डीपी (ट्रांसफॉर्मर) होता. बस जर या डीपीला धडकली असती, तर मोठा वीज अपघात होऊन मोठा अनर्थ घडला असता. मात्र, बसचालकाने दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे आणि वाहनावरील नियंत्रणामुळे संभाव्य भीषण दुर्घटना टळली. सुदैवाने यावेळी बसमध्ये विद्यार्थी किंवा प्रवासी नव्हते, केवळ चालक आणि वाहक उपस्थित होते.

स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, या अपघातांना परिसरातील बेजबाबदारपणा कारणीभूत आहे. सध्या शेतशिवारात धान रोवणीचे दिवस असल्याने ट्रॅक्टरद्वारे शेताची मशागत केली जात आहे. मात्र, शेतातून काम संपवून निघणारे ट्रॅक्टर चालक आपल्या वाहनांची चाके स्वच्छ न करताच थेट मुख्य डांबरी रस्त्यावर येतात. ट्रॅक्टरच्या चाकांना लागलेला ओला चिखल मोठ्या प्रमाणात मुख्य रस्त्यावर पसरतो. सततच्या वाहतुकीमुळे हा चिखल संपूर्ण रस्त्यावर पसरून रस्ता अत्यंत निसरडा बनला आहे. यामुळे दुचाकीस्वारांना वाहनावरील नियंत्रण ठेवणे कठीण होत असून, हा मार्ग अपघातांचे केंद्र बनला आहे.

सोंद्री परिसरातील नागरिकांनी या वाढत्या अपघातांवर तीव्र चिंता व्यक्त केली आहे. भविष्यातील मोठी जीवितहानी टाळण्यासाठी प्रशासनाने व संबंधित विभागाने तातडीने तात्काळ दखल घेऊन रस्त्यावरील चिखल साफ करावा, शेतातून मुख्य रस्त्यावर येण्यापूर्वी ट्रॅक्टर चालकांनी व मालकांनी आपल्या वाहनांची चाके अनिवार्यपणे स्वच्छ करावीत त्यासाठी ट्रॅक्टर चालकांवर निर्बंध घालावे, नियमांचे उल्लंघन करून रस्ता खराब करणाऱ्यांवर प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
दुकानाची वेळ सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404